सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता "वनमहोत्सव" या योजनेच्या माध्यमातून नवीन रोपनिर्मिती व अस्तित्वातील रोपांचे संरक्षण, संगोपन व देखभाल करण्याच्या कामांकरीता लेखाशीर्ष २४०६ ८५५१ अंतर्गत निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक : साववि-२०२६/प्र.क्र.६३ (भाग-१)/वने-११
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १३ ऑगस्ट, २०२६

वाचा :-

१. नियोजन (रोहयो) विभाग, शासन निर्णय क्र.मग्रारो-२०१८/प्र.क्र.१३८/मग्रारो-१, दि.०५.११.२०१८
२. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक साववि-२०२२/प्र.क्र.५८/फ-११, दि.२८.०७.२०२३
३. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं -२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०९.०४.२०२६
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्रमांक : कक्ष-१/पी/यो/वनमहोत्सव/प्र.क्र.७५/४३२/२०२६-२७, दि.१३.०७.२०२६
५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्रमांक: कक्ष-१/पी/यो/वनमहोत्सव/प्र.क्र.७५/४३३/२०२६-२७, दि.१३.०७.२०२६
६. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्रमांक: कक्ष-१/पी/यो/वनमहोत्सव/प्र.क्र.७५/४८९/२०२६-२७, दि.२२.०७.२०२६
७. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्रमांक: कक्ष-१/पी/यो/वनमहोत्सव/प्र.क्र.७५/४९०/२०२६-२७, दि.२२.०७.२०२६
८. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्रमांक: कक्ष-१/पी/यो/वनमहोत्सव/प्र.क्र.७५/४९१/२०२६-२७, दि.२२.०७.२०२६

प्रस्तावना :-

सन २०२६-२७ करिता "वनमहोत्सव" योजनेसाठी २४०६ ८५५१ या लेखाशिर्षांतर्गत **रु.४८२८.०० लक्ष** इतका नियतव्यय अर्थसंकल्पित करण्यात आला आहे.

०२. वित्त विभागाच्या वाचा क्र.३ येथील दि.०९.०४.२०२६ रोजीच्या परिपत्रकान्वये वित्तीय वर्ष सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पीय तरतूदींची मासिक निधी विवरणपत्रे, अर्थसंकल्पीय अंदाज, वाटप आणि संनियंत्रण प्रणालीवर (बीम्स) प्रशासकीय विभागांकडून नोंदविण्यात आल्यानंतर सन २०२६-२७ च्या प्रथम नऊ माहीकरीता (माहे डिसेंबर, २०२६ अखेर) आवश्यक असणारा अनिवार्य व कार्यक्रमांतर्गत खर्चाचा अर्थसंकल्पीत निधी एकूण वार्षिक तरतूदीच्या ६० टक्क्यांच्या मर्यादेत अर्थसंकल्पीय अंदाज, वाटप आणि संनियंत्रण प्रणालीव्दारे (बीम्स) वितरीत करण्यात येत आहे.

०३. वाचा क्रमांक २ येथील दि.२८.०७.२०२३ शासन निर्णयान्वये वन व वनोत्तर क्षेत्रात वनीकरण आणि मृद व जलसंधारणाची कामे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व राज्य योजनांसोबत अभिसरण करून घेण्यास (Top-up model) मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार

"वनमहोत्सव" (२४०६-८५५१) या योजनेंतर्गत करण्यात येणारी सर्व कामे सुध्दा अभिसरण योजनेंतर्गत करणे आवश्यक आहे. तथापि, वाचा क्र.१ येथील नियोजन विभागाच्या (रोजगार हमी योजना) दि.०५.११.२०१८ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.३ मधील अनुक्रमांक ११ नुसार अभिसरणांतर्गतची कामे ही ग्रामीण क्षेत्रामध्येच घेणे बंधनकारक आहे. यास्तव, "वनमहोत्सव" या योजनेंतर्गत शहरी भागातील म्हणजेच महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत, लष्करी छावणी व औद्योगिक क्षेत्रातील प्रस्ताव राज्य योजनेतून मंजूर करण्यात येत आहेत.

०४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी वाचा क्र.४ ते ८ येथील प्रस्तावांन्वये ग्रामीण भागातील अभिसरण योजनेच्या माध्यमातून व शहरी भागातील राज्य योजनेच्या माध्यमातून रोप निर्मितीच्या चालू बाब व नवीन बाब कामांच्या अनुषंगाने सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता "वनमहोत्सव" (२४०६-८५५१) या योजनेंतर्गत नवीन रोपनिर्मिती व अस्तित्वातील रोपांचे संरक्षण, संगोपन व देखभाल करीता निधी वितरीत करण्याची मागणी केली आहे. त्यास अनुसरून वित्त विभागाने बीम्स प्रणालीवर लेखाशिर्ष २४०६-८५५१ अंतर्गत उपलब्ध करून दिलेल्या रकमेच्या मर्यादेत निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सामाजिक वनीकरण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या "वनमहोत्सव" या योजनेकरीता सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता ग्रामीण भागात अभिसरण योजनेच्या माध्यमातून व शहरी भागात राज्य योजनेच्या माध्यमातून **रोपवाटिकांमध्ये नवीन रोपनिर्मिती व अस्तित्वातील रोपांचे संरक्षण, संगोपन व देखभाल करीता** लेखाशिर्ष २४०६ ८५५१ अंतर्गत निधी वितरीत व खर्च करण्यास मान्यता देण्यात येत असून त्याचा वनवृत्तनिहाय तपशील खालीलप्रमाणे आहे:-

(रोप संख्या व रू.लाखात)

अ) अभिसरणांतर्गत

अ. क्र.	प्रस्ताव क्र. व दिनांक	सा.व. वनवृत्त /वन विभाग	रोपवाटिकेचे नाव	कामाची बाब	रोपे संख्या	एकूण मागणी		वितरीत करावयाचा निधी		
						०२-मजूरी	२१-साहित्य व पुरवठा	०२-मजूरी	२१-साहित्य व पुरवठा	एकूण
१.	क्र.४३२, दि.१३.०७.२०२६	पुणे/ **कोल्हापूर**	पिंपळे तर्फे सातव रोपवाटिका	१२.५० X २५ सें.मी. च्या पिशवतील लहान रोप निर्मिती	१.५०	९.२६	०.००	४.६३	०.००	४.६३
			कंळबा रोपवाटिका	उंच रोपे निर्मिती	०.१०	०.९९	०.००	०.५०	०.००	०.५०
				एकूण	**१.६०**	**१०.२५**	**०.००**	**५.१३**	**०.००**	**५.१३**

२.	क्र.४३२, दि.१३.०७. २०२६	पुणे/ **सातारा**	-	१२.५० X २५ सें.मी. च्या पिशवतील लहान रोपे निर्मिती व संगोपन	०.२०	१.४२	०.१६	०.७१	०.०८	०.७९
				२०x३० सें.मी. आकाराच्या पिशवीत रोपे निर्मिती व संगोपन (उंच रोपे)	०.२०	४.३२	०.५५	२.१६	०.२८	२.४४
				एकूण	**०.४०**	**५.७४**	**०.७१**	**२.८७**	**०.३६**	**३.२३**
३.	क्र.४३३, दि.१३.०७. २०२६	नागपूर/ **नागपूर**	ठोंबरा भाग-१ अ, पाटण सावंगी	लहान रोपे निर्मिती	०.८५	७.६७	४.४४	३.८४	२.२२	६.०६
			ठोंबरा भाग-१ ब व क, नवेगाव खैरी भाग २ (अ व ब)	उंच रोपे निर्मिती करणे.	१.२०	२६.१५	१४.६५	१३.०८	७.३३	२०.४०
				एकूण	**२.०५**	**३३.८२**	**१९.०९**	**१६.९१**	**९.५५**	**२६.४६**
४.	क्र.४३३, दि.१३.०७. २०२६	नागपूर/ **गोंदिया**	मुरदोली भाग ४ ते ६	लहान रोपे निर्मिती	१.५०	६.४८	०.७५	३.२४	०.३८	३.६२
				एकूण	**१.५०**	**६.४८**	**०.७५**	**३.२४**	**०.३८**	**३.६२**
५.	क्र.४३३, दि.१३.०७. २०२६	पुणे/ **सातारा**	शिरवळ	उंच रोपे निर्मिती, संगोपन व देखभाल	०.१८	५.७०	०.००	२.८५	०.००	२.८५
				एकूण	**०.१८**	**५.७०**	**०.००**	**२.८५**	**०.००**	**२.८५**
६.	क्र.४३३, दि.१३.०७. २०२६	नागपूर/ **चंद्रपूर**	कढोली	१२.५० X २५ सें.मी. लहान रोपे निर्मिती (एप्रिल,२६ ते ऑगस्ट, २६)	२.००	११.१६	०.००	५.५८	०.००	५.५८
				एकूण	**२.००**	**११.१६**	**०.००**	**५.५८**	**०.००**	**५.५८**
७.	क्र.४९०,	नाशिक/	गंगापूर,	लहान रोपे	२.००	१७.२१	०.००	८.६१	०.००	८.६१

	दि.२२.०७.२०२६	**नंदुरबार**	मांडवी, दुधखेडा	निर्मिती						
				एकूण	**२.००**	**१७.२१**	**०.००**	**८.६१**	**०.००**	**८.६१**
८.	क्र.४९०, दि.२२.०७.२०२६	अमरावती/ **बुलढाणा**	-	उंच रोपे बांधील कामे	२.९९	७.६७	०.००	३.८४	०.००	३.८४
				एकूण	**२.९९**	**७.६७**	**०.००**	**३.८४**	**०.००**	**३.८४**
				अ) अभिसरणांतर्गत एकंदर एकूण	**१२.७२**	**९८.०३**	**२०.५५**	**४९.०२**	**१०.२७**	**५९.२९**

(रोप संख्या व रू.लाखात)

ब) राज्य योजनेंतर्गत

अ. क्र.	**प्रस्ताव क्र. व दिनांक**	**सा.व. वनवृत्त /वन विभाग**	**रोपवाटिकेचे नाव**	**कामाची बाब**	**रोपे संख्या**	**एकूण मागणी**		**वितरीत करावयाचा निधी**		
						०२-मजूरी	**२१-साहित्य व पुरवठा**	**०२-मजूरी**	**२१-साहित्य व पुरवठा**	**एकूण**
१.	क्र.४३३, दि.१३.०७.२०२६	नागपूर/ **चंद्रपूर**	लोहारा	२०x३० सें.मी उंच पिशवीतील रोपांचे संगोपण व देखभाल (प्रलंबित निधी)	०.४९	५.०६	०.९१	२.५३	०.४६	२.९९
			लोहारा	लहान रोपे निर्मिती	१.५०	१३.०१	०.००	६.५१	०.००	६.५१
				एकूण	**१.९९**	**१८.०७**	**०.९१**	**९.०४**	**०.४६**	**९.४९**
२.	क्र.४३३, दि.१३.०७.२०२६	नागपूर/ **वर्धा**	बरबडी (MIDC) रोपवाटिका	लहान रोपे निर्मिती	०.५०	८.१३	२.७८	४.०७	१.३९	५.४६
				उंच रोपे निर्मिती करणे.	०.५०	१९.६८	६.८७	९.८४	३.४४	१३.२८
				एकूण	**१.००**	**२७.८१**	**९.६५**	**१३.९१**	**४.८३**	**१८.७३**
३.	क्र.४८९, दि.२२.०७.२०२६	पुणे/ **कोल्हापूर**	कागल, करवीर	लहान रोपे संगोपन व देखभाल	१.७०	१२.५०	१.४१	६.२५	०.७१	६.९६

		अमरावती/ **अमरावती**	वडाळी	लहान रोपे निर्मिती प्रलंबित निधी	३.४०	४०.११	०.००	२०.०६	०.००	२०.०६
				एकूण	**५.१०**	**५२.६१**	**१.४१**	**२६.३१**	**०.७१**	**२७.०१**
४.	क्र.४९१, दि.२२.०७.२०२६	नागपूर/ **नागपूर**	सेमीनरी हिल्स	२५ x ४० से.मी. पिशवीत रोपे निर्मिती	०.१०	६.३५	३.२५	३.१८	१.६३	४.८०
				२० x ३० से.मी. पिशवीत रोपे निर्मिती	०.२०	७.९८	४.१०	३.९९	२.०५	६.०४
				एकूण	**०.३०**	**१४.३३**	**७.३५**	**७.१७**	**३.६८**	**१०.८४**
५.	क्र.४९१, दि.२२.०७.२०२६	नागपूर/ **चंद्रपूर**	लोहारा	२० x ३० से.मी. पिशवीत रोपे निर्मिती	०.९०	३३.७७	१४.११	१६.८९	७.०६	२३.९४
				२५ x ४० से.मी. पिशवीत रोपे निर्मिती	०.६०	३५.६४	१३.९३	१७.८२	६.९७	२४.७९
				एकूण	**१.५०**	**६९.४१**	**२८.०४**	**३४.७१**	**१४.०२**	**४८.७३**
६.	क्र.४९१, दि.२२.०७.२०२६	नाशिक/ **नंदूरबार**	बंधारापाडा, रंगावली, आमलाड	लहान रोपे निर्मिती	६.००	१०७.६७	३३.९७	५३.८४	१६.९९	७०.८२
				एकूण	**६.००**	**१०७.६७**	**३३.९७**	**५३.८४**	**१६.९९**	**७०.८२**
७.	क्र.४९१, दि.२२.०७.२०२६	नागपूर/ **गडचिरोली**	चार्मोशी व मध्यवर्ती रोपवाटिका, गडचिरोली	लहान रोपे निर्मिती	३.००	५३.७४	१६.२०	२६.८७	८.१०	३४.९७
			मध्यवर्ती रोपवाटिका, गडचिरोली	२० x ३० से.मी. पिशवीत उंच रोपे निर्मिती	२.००	८६.७७	२५.८५	४३.३९	१२.९३	५६.३१

			वडसा-वाकडी, एकलपूर, ठाणेगाव	लहान रोपे निर्मिती	१.५०	२७.०८	७.२४	१३.५४	३.६२	१७.१६
			अहेरी- गेरी रोपवाटिका		०.५०	८.९५	२.७०	४.४८	१.३५	५.८३
				एकूण	**७.००**	**१७६.५४**	**५१.९९**	**८८.२७**	**२६.००**	**११४.२७**
८.	क्र.४९१, दि.२२.०७. २०२६	पुणे/ **कोल्हापूर**	कागल भाग-१ व २, सदर बाजार, मध्यवर्ती रोपवाटिका कागल	लहान रोपे निर्मिती	५.००	७६.३०	३८.२५	३८.१५	१९.१३	५७.२८
			मध्यवर्ती रोपवाटिका कागल	२० x ३० से.मी. पिशवीत उंच रोपे निर्मिती	१.२०	४२.७५	२७.८१	२१.३८	१३.९१	३५.२८
				एकूण	**६.२०**	**११९.०५**	**६६.०६**	**५९.५३**	**३३.०३**	**९२.५६**
९.	क्र.४९१, दि.२२.०७. २०२६	पुणे/ **पुणे**	B.S.D.T. वाघोली	लहान रोपे निर्मिती	१.७५	३५.६९	८.५३	१७.८५	४.२७	२२.११
				एकूण	**१.७५**	**३५.६९**	**८.५३**	**१७.८५**	**४.२७**	**२२.११**
१०.	क्र.४९१, दि.२२.०७. २०२६	पुणे/ **सातारा**	शिरवळ	लहान रोपे निर्मिती	३.००	४८.७५	१८.४५	२४.३८	९.२३	३३.६०
			शिरवळ, कोडोली, डी.जी. कॉलेज	२० x ३० से.मी. पिशवीत उंच रोपे निर्मिती	३.५०	१३७.८०	७५.७०	६८.९०	३७.८५	१०६.७५
			शिरवळ	२५ x ४० से.मी. पिशवीत रोपे निर्मिती	०.२५	१४.१०	९.१४	७.०५	४.५७	११.६२
				एकूण	**६.७५**	**२००.६५**	**१०३.२९**	**१००.३३**	**५१.६५**	**१५१.९७**
				ब) राज्य योजनेंतर्गत एकंदर एकूण	**३७.५९**	**८२१.८३**	**३११.२०**	**४१०.९२**	**१५५.६०**	**५६६.५२**
				अ + ब एकूण	**५०.३१**	**९१९.८६**	**३३१.७५**	**४५९.९४**	**१६५.८७**	**६२५.८१**

उपरोक्त तक्त्यात नमुद केल्यानुसार सन २०२६-२७ आर्थिक वर्षाकरीता **“वनमहोत्सव” या योजनेंतर्गत ग्रामीण व शहरी भागातील रोपवाटिकांमध्ये नवीन रोपनिर्मिती व अस्तित्वातील रोपांचे संरक्षण, संगोपन व देखभाल करीता लेखाशिर्ष २४०६-८५५१ अंतर्गत ०२-मजूरी या उद्दिष्टाखाली रु.४५९.९४ लक्ष आणि २१- साहित्य व पुरवठा या उद्दिष्टाखाली रू.१६५.८७ लक्ष असे एकूण रू.६२५.८१ लक्ष (रुपये सहा कोटी पंचवीस लक्ष एक्याऐंशी हजार मात्र)** इतका निधी वितरीत व खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

०२. सदर निधी नियंत्रक अधिकारी म्हणून अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्याकडे सुपूर्त करण्यात येत आहे. **अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी सदर कामांना निधी वितरीत करताना वन वृत्त/विभाग निहाय कामांचा तपशिल तपासूनच व सदर रोपवाटिकांचे क्षेत्र शहरी भागात म्हणजेच महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत, लष्करी छावणी व औद्योगिक क्षेत्रात येत असल्याचे संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थेने प्रमाणित केल्याची खात्री करूनच कार्यवाही करावी.**

०३. प्रस्तुत योजनेंतर्गत करण्यात आलेल्या कामाची अंमलबजावणी कृती आराखड्याप्रमाणे, विहित कार्यपध्दतीनुसार आणि ठरविलेल्या मुदतीत करण्यात आली आहे, याबाबतची दक्षता घ्यावी. याबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना क्षेत्रीय अधिकाऱ्यांना द्याव्यात आणि अंमलबजावणीबाबत वेळोवेळी आढावा घेण्यात यावा. मंजूर निधीपेक्षा जास्त खर्च होणार नाही, याची नियंत्रक अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी.

०४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) हे वर्ष २०२६-२७ मध्ये सदर योजनेंतर्गत वितरीत केलेल्या निधीबाबत उपयोगिता प्रमाणपत्र ७ दिवसांत शासनास सादर करतील. सदर निधी वितरीत करताना करण्यात येत असलेली कामे ही **वाचा क्रमांक २ येथील दिनांक २८.०७.२०२३ मधील तरतुदी, वाचा क्रमांक ३ येथील शासन परिपत्रकातील सुचना, शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सुचना तसेच सक्षम प्राधिकारी यांनी मान्यता दिलेल्या अंदाजपत्रकानुसार तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आल्याची खातरजमा करून निधी वितरणाची कार्यवाही नियंत्रक अधिकारी यांनी करावी.** तसेच सदर निधी खर्च करताना सुध्दा शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सुचनांचे पालन करण्याबाबतच्या सुचना अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्या कार्यालयाकडून संबंधीतांना देण्यात याव्यात.

०५. सदर निधी वितरित करण्यापूर्वी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी सदर योजनेसाठी सन २०२६-२७ करीता वितरित केलेला निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीव्यतिरिक्त अन्यत्र ठिकाणी वळती केला नसल्याची खात्री करावी.

०६. सदर निधी खर्च करताना वित्त विभागाच्या वाचा क्रमांक ३ येथील शासन परिपत्रकातील तरतूदी व महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियम पुस्तिका, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका यामध्ये उल्लेख केलेल्या तरतुदी व वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करण्यात यावे.

०७. वन वृत्त/विभाग निहाय वितरीत तरतुदीची माहिती व राबविण्यात आलेल्या कार्यक्रमाचा/झालेल्या खर्चाचा तपशील शासनास दरमहा विहित प्रपत्रात सादर करण्यात यावा. तसेच योजनेचे संनियंत्रण प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्यामार्फत व्हावे.

०८. सदर योजनेअंतर्गत होणारा खर्च खाली नमूद केलेल्या लेखाशीर्षाखाली सन २०२६-२७ च्या मंजूर अर्थसंकल्पीत निधीतून खर्ची टाकण्यात यावा.

मागणी क्र.सी-०७
२४०६, वनीकरण व वन्यजीवन,
राज्य योजनेंतर्गत योजना (११)(३४) वनमहोत्सव योजनंतर्गत (राज्य) (२४०६ ८५५१)
०२- मजूरी, २१-साहित्य व पुरवठा

०९. सदर शासन निर्णय, वित्त विभागाचे दिनांक ०९.०४.२०२६ रोजीचे परिपत्रक तसेच वित्त विभागाच्या शासन निर्णय क्रमांक-विअप्र/२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

१०. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२६०८१३१८१७५४३७४० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

PRATAP RAJENDRA SATPUTE

Digitally signed by PRATAP RAJENDRA SATPUTE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=46e55cdbf3321ecaa0de879cc768619afcdbda90e6691b3baf2255384355942f, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=47A54DFAE5D873AD7624C29CACBF61D571ADA2CBEECE334AB2E56A179C9FF19F, cn=PRATAP RAJENDRA SATPUTE
Date: 2026.08.13 18:19:57 +05'30'

(प्रताप राजेंद्र सातपूते)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख),महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, पुणे.
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), नागपूर
४. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) (११ वृत्त)
५. वनसरंक्षक, सामाजिक वनीकरण (६ वृत्त)
६. विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण (सर्व जिल्हे)
७. महालेखापाल, (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ व २ , मुंबई व नागपूर,
८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई ४०० ०३२.
१०. निवासी परिक्षा लेखा अधिकारी, मुंबई
११. वित्त विभाग,व्यय-१०,अर्थसंकल्प-०६ मंत्रालय, मुंबई-३२
१२. कार्यासन अधिकारी, वने-२, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१३. कार्यासन अधिकारी, अर्थसंकल्प, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१४. उप सचिव/अवर सचिव (सर्व), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१५. निवडनस्ती वने-११.